महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं/पमा/खाजगी/ 154
नागपूर, दिनांक– 16/01/2024

**महत्वाचे**
**परिक्षा प्राधान्य**

प्रति,
मुख्यध्यापक/प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.
भंडारा, चंद्रपुर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया.

विषय :– फेब्रुवारी/मार्च 2024 मध्ये होणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमापत्र (इ. 10वी) परीक्षेकरिता उपस्थिती मधील तूट (Deficiency In Attendance) क्षमापित करण्यात अधिकाराबाबत.
संदर्भ :– पत्र क.रा.कं./परीक्षा –8/129, दिनांक 11/01/2024.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी/मार्च 2023 करिता नियमित विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांची दोन्ही शालेय सत्रातील किमान उपस्थिती स्वतंत्रपणे 75% असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75% पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्याचे बाबतीत नियमित विद्यार्थ्यांची 31 जानेवरी 2024 पर्यंत प्रमाणित केलेली हजेरी सोबतच्या प्रपत्रात भरून या कार्यालयाकडे दिनांक 05/02/2023 पर्यंत अथवा तत्पुर्वी पोहचेल अशा बेताने सोबतचे प्रपत्र शिफारसी सह मुदतीत पाठवावे.

प्रथम सत्रातील हजेरीचा कालखंड – प्रारंभा पासून ते 20/10/2023 पर्यंत
व्दितीय सत्रातील हजेरीचा कालखंड 21/10/2023 ते 31/10/2024 पर्यंत

1) पहिल्या व दुस–या सत्रातील स्वतंत्रपणे हजेरीचे प्रमाण 60% किंवा त्यापेक्षा जास्त परंतू 75% पेक्षा कमी असणारे नियमित विद्यार्थी.

उपरोक्तप्रमाणे हजेरीची टककेवारी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळ नियमावली नियम कमांक 41(1) 88(1) (अ,ब) नुसार पाठवावयाचे आहेत. नियमावलीतील या तरतुदीनुसार शालेय सत्रातील पहिल्या , दुस–या किंवा दोन्ही सत्रातील स्वंतत्रपणे 75% किमान उपस्थितीची अट जो उमेदवार पूर्ण करीत नसेल, परंतु ज्यांची उपस्थिती प्रत्येक सत्रात किमान 60% किंवा त्यापेक्षा जास्त परंतू 75% पेक्षा कमी असेल, अशा विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित करण्याबाबत सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये माहिती भरून पाठवावी, अशा विद्यार्थ्यांचे बाबतीत मा. विभागीय अध्यक्ष, प्राचार्य/मुख्याध्यापकांनी शिफारस केल्याप्रमाणे प्रकरणाच्या गुणतत्तेनुसार उपस्थितीची टक्केवारीची उणीव 15% पर्यंत क्षमापित (Condone) करू शकतात. अश्या विद्यार्थ्यांची माहिती प्राचार्य/मुख्याध्यापकामार्फत दिनांक 05/02/2024 पर्यंत किंवा तत्पूर्वी पाठविणे आवश्यक आहे.

या खेरीज भारतात किंवा परदेशात झालेल्या कोणत्याही आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय किंवा आंतरराज्य कीडा स्पर्धेमध्ये किंवा खेळामध्ये भारताचे किंवा महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणा–या विद्यार्थ्यांचे बाबतीत अशा भाग घेण्यामुळे विद्यालयात त्याला जेवढे दिवस अनुपस्थित रहावे लागले असेल त्या मर्यादेपेक्षा 15% पेक्षा अधिक होणारी अनुपस्थिती प्राचार्य/मुख्याध्यापकांच्या शिफारसीवरून क्षमापित करता येईल.

2) दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे उपस्थिती 50% किंवा त्यापेक्षा जास्त परंतू 60% पेक्षा कमी आहे नियमित विद्यार्थी.

ज्या विद्यार्थ्यांची पहिल्या, दुस–या किंवा दोन्ही सत्रातील उपस्थिती स्वतंत्रपणे 50% किंवा त्यापेक्षा जास्त परंतू 60% पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांचे बाबतीत प्रस्ताव खालीप्रमाणे पाठवावेत.

ज्या नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती शैक्षणिक वर्षाच्या प्रत्येक सत्रात स्वतंत्रपणे 50% किंवा त्यापेक्षा जास्त परंतू 60% पेक्षा कमी आहे आणि सदर त्रूटीचे कारण खालील प्रमाणे असल्यास...

अ) विद्यार्थ्यांचा दिर्घ आजार.
ब) विद्यार्थ्याचे आई / वडीलांचे आकस्मिक निधन.
क) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास दरम्यानच्या काळात ब–याच कालावधीसाठी परगांवी / परदेशी जाणे भाग पडल्यास.

वरील संयुक्तीक कारणे योग्य पुराव्यासह विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत मा. विभागीय अध्यक्षांकडे दिनांक 05 / 02 / 24 पर्यंत अर्ज सादर करू शकतात. या अर्जासोबत पुराव्याच्या कागदपत्रासह कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची विहित नमुन्यात प्रपत्र "अ" मध्ये शिफारस करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांचे उपस्थिती क्षमापित करण्याचे प्रस्ताव मा. अध्यक्ष, राज्य मंडळ पुणे यांनी मान्य केल्यास त्यांची उपस्थिती क्षमापित करण्यात येईल अन्यथा नाही. सदरहू अनुपस्थितीबाबत विद्यार्थ्यांचे आजाराचे कारण दिले असल्यास सोबत वैधकिय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

3) ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 75% किंवा त्यापेक्षा जास्त आहे त्याची नावे कळविण्याची आवश्यकता नाही.

विनियम क्र. 88(1)(अ) नुसार आवश्यक असलेल्या उपस्थितीची अट पुर्ण झालेली नसल्यास विनियम 93(8) मधील तरतुदी नुसार आवेदन पत्रे मागे घेण्याच्या (withdraw) परवानगी साठी विद्यालयाच्या प्राचार्य / मुख्याध्यापकांनी प्रस्ताव विहित नमुना प्रपत्र "ब" मध्ये दिनांक 05.02.2024 पर्यंत किंवा तत्पुर्वी विभागीय मंडळ कार्यालयात पोहचतील अश्या बेताने पाठविणे आवश्यक आहे.

विनियम क्र. 41(1) व 88(1)(अ) अन्वये आवश्यक असलेली उपस्थितीची अट पुर्ण झालेली नाही या कारणाशिवाय इतर कोणत्याही कारणावरून या विनियमाखाली कोणताही अर्ज मागे (withdraw) घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

4) आपल्या शाळा कनिष्ठ माहाविद्यालयातील नियमीत विद्यार्थ्यांची उपस्थिती नियमाप्रमाणे क्षमापित करण्याची अथवा आवेदनपत्रे मागे घेण्याबाबतचा प्रस्ताव अनुक्रमे प्रपत्र "अ", "ब" मध्ये पाठवावा. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित करण्याची शिफारस प्राचार्य / मुख्याध्यापक करू इच्छित नसतील त्याच्या बाबतीत स्पष्ट खुलासा परिशिष्टात करण्यात यावा म्हणजेच विभागीय अध्यक्षांना स्वाधिकार वापरणे किंवा न वापरणे या बाबतचा न्याय निर्णय घेणे सुलभ होईल.

प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी वरील दोन्ही प्रकरणांचे प्रस्ताव मुदतीच्या आत सोबतच्या नमुना तक्त्यात पाठवावे प्रस्ताव विहीत मुदतीनंतर प्राप्त झाल्यास व परीणामी विद्यार्थ्यांने परीक्षेस नियमाबाहय प्रवेश मिळविल्यास त्यांची जबाबदारी व्यक्तिश; प्राचार्य / मुख्याध्यापकांवर राहील.

5) इ. 12 वीत शिकत असणा–या विद्यार्थ्यांस प्रथम व व्दितीय सत्रातील उपस्थिती किमान 75% असणेबाबत. उच्च माध्यमिक परीक्षेस प्रविष्ठ होण्यास पात्र समजण्यासाठी इ. 12 वी शिकत असणा–या